# पल्सार

शीतल शांत रात्री मी समुद्राच्या किनाऱ्यावर पहुडलो होतो. समुद्राची शांत गाज कानी पडत होती. सकाळी हिरवा-निळा दिसणारा समुद्र आता काळवंडला होता. एखादी उन्नत लाट मात्र पांढरी-चंदेरी किनार दाखवीत होती. नाहीशी होऊन तिची जागा दुसरी लाट घेत होती. वरती आभाळाचा घुमट टपोऱ्या चांदण्यांची झुंबरं लेवून माझ्यावर ओणवं होऊन पाहत होता!

अथांग समुद्र तेवढाच अथांग समुद्रकिनारा. आणि त्या सर्वांवर बिन खांबाचं, आभाळाचं हिरे जडित छप्पर!

अचानक मला स्वतःच्या क्षुद्रतेची जाणीव होऊ लागली. आणि मी शरमेनं काळवंडू लागलो. परत मी एकदा आभाळाकडे दृष्टी टाकली. तेवढ्यात आभाळात एक छोटासा तारा तेजानं चमचम करताना मला दिसला. एवढ्या विस्तीर्ण आभाळात चमचमणाऱ्या चांदण्यांच्या प्रकाशात, अगदी छोट्याशा पण तेजःपुंज ताऱ्यानं माझं लक्ष वेधून घेतलं!

आपोआप माझी निराशा गायब झाली. माझ्या लक्षात आलं 'अरेच्या एवढ्या प्रचंड पृथ्वीवर मी एवढासा जीव नाहीय. तर मी पृथ्वीतलावरचा एक सातत्याने प्रचंड स्पंदन पावणारा पल्सार आहे. मी पल्सार आहे.'

रवि जोशी
०२ अप्रिल २०१५.

